||श्री||

# मानवधर्मासाठी

पुन्हा पुन्हा जन्म घ्यायला वेळ आहे कुणाला ?
याच जन्मावर भरवसा ठेवून सगळं साधायचंय मला

शास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान शिकून घ्यायचं म्हणतो
चंद्रावर मंगळावर जाऊन पृथ्वीची मिजास सांगतो.

रोज नवा सवंगडी शोधणारी प्रेमी युगुलं पाहतो
माझ्यासाठी एखादी सावित्री चंद्रावरूनच आणतो.

भुकंपाची चिंता नको सुनामीच्या लाटा नको
इथलं दुःख दारिद्र्य पाहून वृथा भावनिक व्हायला नको.

पर्यावरणाची भिती नको भ्रष्टाचाराचे भूत नको
राजकारण्यांच्या ढोंगी कुंडात कुणाचाही बळी नको.

ध्येयनिष्ठ भक्तिसाठी खरंच मन धजावत नाही
विश्वासाने मान टेकावी असा खांदा गवसत नाही.

सत्य अहिंसा सात्विकतेला या पृथ्वीवर नाही थारा
मानेच्या सोज्वळ मायेचा गुदमरून गेला वारा

आता नाही उरले काही या धरतीवर मरणासाठी
पुण्यसुध्दा अनाथ झाले पाप्यांच्या या सरणावरती

बांझोट्या तत्वांच्या ठाई पूजा अर्चना नसते खरी
म्हणून झालो अधीर जाण्या चंद्र अथवा मंगळावरी

नसेल तेथे भेदभाव ना, देव देश अन् धर्मासाठी (धर्म अन जातीसाठी)
नविन दुनिया वसवू तेथे केवळ मानवधर्मासाठी.

सहदेव
११/१०/२०११